महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी-३५९५/समवि/[१३७/९५]/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

प्रति,

दिनांक : ४ ऑगस्ट, १९९५.

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय : सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून
कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांची
नविन महाविद्यालये उघडण्यास परवानगी.

महोदय,

सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून नविन महाविद्यालये उघडण्याकरीता शासनास प्राप्त झालेले अर्ज/शिफारशींचा विचार करुन पुढे नमुद केलेल्या संस्थेस १९९५-९६ पासून नविन महाविद्यालय उघडण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२[५] अनुसार शासन खालील प्रमाणे परवानगी देत आहे :-

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- | --- |
| फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. | फोंडाघाट | कला व वाणिज्य |

२. शासनाने दिलेली सदर परवानगी पुढील अटींवर आहे :-

१] सदर महाविद्यालयास देण्यात आलेली परवानगी विना अनुदान तत्वावर असून या विभागाच्या शासन निर्णय क्र. एनजीसी-२०९१/[३५९७]/विशि-२ दि. ८.८.१९९१ अन्वये लागू करण्यात आलेल्या सुत्रानुसार व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या अनुदान संदर्भातील शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून सदर महाविद्यालयास अनुदान तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

२] ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्या प्रत्येक विद्याशाखेच्या ~~प्रथम वर्ष~~ पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ष १९९५-९६ पासून

वर्ग सुरु करावा. तसेच, शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी ५० विद्यार्थी बसणे आवश्यक असेल.

३. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदी नुसार संलग्निकरण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने करावी व त्याची प्रत संबंधित सहसंचालक उच्च शिक्षण आणि शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना अग्रेषित करावी.

आपला विश्वासू,

[ सु. द. पडवळ ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१] शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
२] विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.
३] सचिव/अध्यक्ष, फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.
४] खाजगी सचिव, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण.
५] खाजगी सचिव, राज्यमंत्री, शिक्षण.
६] स्वीय सहाय्यक, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण.
७] निवड नस्ती, मशि-३.

# University of Bombay

क्रमांक: संलग्नता/मान्यता/ ४५०८ १९९५
मुंबई ४०० ०३२
१८ सप्टेंबर, १९९५

सेक्रेटरी
फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी,
फोंडाघाट,
जिल्हा-सिंधुदुर्ग ४१६ ६०१.

विषय:- विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत.

महोदय,

आपल्या सोसायटीला फोंडाघाट येथे कला व वाणिज्य महाविद्यालय शैक्षणिक वर्ष १९९५-९६ पासून सुरु करण्यास महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८२[५] अन्वये मान्यता दिली आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाब कुलगुरूंनी सोसायटीच्या महाविद्यालयास प्रथम वर्ष कला व वाणिज्य या विद्याशाखांमध १९९५-९६ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश देण्यास मंजूरी दिली आहे. प्रवेश देताना शासनाने घातलेल्या अटींची पूर्तता करावी. तसेच विद्यापीठाने वेळोवेळी घातलेल्या अटींचे पालन करावे व सोबत जोडलेल्या अध्यादेश २८०२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. आपल्या महाविद्यालयाला भेट देऊन चौकशी करण्यासाठ खालील सदस्यांची स्थानिय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. ही समिती लवक आपल्या महाविद्यालयाला भेट देईल.

१] प्राचार्य आर.एम्. माने [निमंत्रक]
२] प्राचार्य बी.एन्. काटकर
३] प्राचार्य डी.अे. पवार

आपला विश्वासू

जा.के. मयेकर
कुलसचिवांकरिता

Received on 26/9/95

Arts & Comm. College
Phondaghat
Let No 02 File No. 30
Date - 08.04.2004

क्र.एनजीसी/२००१/४०५५०/मुंबई/मवि-१
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.
दिनांक

संदर्भ-- १. शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/२०९१/(३५६७)/विशी-२अ.दि. ८-८-९१.
२. शासनपरिपत्रक क्रमांक- एनजीसी/१०९३/(५९१८)/मशि-३. दि.१९-६-९५.
४. शासन परिपत्रक क्रमांक-मुविसं/१९९६/(विसाअ)/(५०१/९६)मशि-३ दि.५-६-९६.
४. सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग मुंबई यांचे पत्र क्रमांक
सहसं/उशि/मुवि/नमवि/अनु-२००३-०४/६६२ दि.१३.२.२००४.

आदेश :-

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, निर्णय क्रमांक- एनजीसी/२०९३/(४७७७)/ युएनआय-२अ. दिनांक १८-१०-९३ अन्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे-१ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये व संदर्भाधिन सहसंचालक उच्च शिक्षण, मुंबई यांच्या पत्रान्वये केलेली शिफारस विचारात घेवून संचालनालयाचे संदर्भांकित अ.क्र.४ व ५ चे आदेश रद्द करण्यात येत असून सदर सुधारीत आदेशानुसार खालीलप्रमाणे महाविद्यालयाला सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा | शैक्षणिक वर्ष | अनुदान मंजूर केलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, फोंडाघाट | कला व वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग | कला (१ तुकडी) | २००१-०२ | १०० % |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई यांनी अनुदान निर्धारण करून ते अदा करण्यापूर्वी खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे, याची खातरजमा करून घ्यावी.

या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे, त्या विद्याशाखेमध्ये परिक्षेला प्रथम वर्षी प्रत्यक्ष बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापिठाच्या निकालपत्रावरून तपासून घ्यावी व ती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी. नंतरच अनुदान निर्धारण करून अनुदान मंजूर करण्यात यावे.

१ या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, त्या प्रत्येक विद्याशाखेतील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षातील प्रत्येक विषयासाठी शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/१०९३/(५९१८)मशि-३, दि. १९-जून, १९९५ व शासन निर्णय क्रमांक दि. १७ मार्च १९९९, अन्वये खालीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

E:\C-backup-2\C-Backup\mv-1\Joshi\Grant.doc

एनजीसी/१०९३/(५९१८)मशि-३, दि. १९-जून, १९९५ व शासन निर्णय क्रमांक दि. १७ मार्च १९९९, अन्वये खालीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १.शहरी भाग | २४ विद्यार्थी |
| २.आदिवासी व दुर्गम विभागातील मुलामुलींची महाविद्यालये, ग्रामीण विभागातील महाविद्यालये आणि ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील महिला महाविद्यालये व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालये. | १० विद्यार्थी |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांनी अनुदान निर्धारणाच्या वेळी प्रत्येक विषयासाठी वरीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध आहेत किंवा कसे, यांची खात्री करून घ्यावी व त्यानंतर त्या विषयासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील खर्चावर अनुदान मंजूर करून अदा करावे.

२ अनुदान निर्धारण करतांना फक्त शासनाने मान्यता दिलेल्या तुकडयाच विचारात घ्याव्यात.

३ जी विद्याशाखा अनुदानावर आणली आहे, त्या विद्याशाखेचा कार्यभार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी तपासून नियमानुसार शिक्षक व शिक्षकेतरांची पदे मंजूर करावीत.

४. महाविद्यालयास/विद्याशाखेस अनुदान मंजूर केल्यामुळे जी पदे निर्माण होतील त्या पदावर संबंधित विषयांच्या अतिरिक्त शिक्षकांना शासनाच्या निर्णयाप्रमाणे सामावून घ्यावे.

५. अनुदान निर्धारण करतांना विद्यापीठाने व शासनाने त्या संबंधित महाविद्यालयांच्या विद्याशाखांना व तुकडयांना संलग्निकरण मंजूर केल्याची खात्री करून घ्यावी.

६. शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील नियुक्त केलेले कर्मचारी शासनाच्या व विद्यापीठांच्या आदेशानुसार सेवाप्रवेशाच्या अटी पूर्ण करणारे असावेत. शिक्षक संवर्गातील नेमणूकांना विद्यापीठाची मान्यता प्रदान केलेली असावी. मागासवर्गीय संवर्गाच्या आरक्षणाबाबत असलेल्या तरतूदीचे पालन करावे.

७. शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२७७/१२२११६/३२/सेल दि.२१-९-७७ व शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०९६/८१५८/४१२६/विशी-४,दि.१९-४-९७ अन्वये महाविद्यालयास देण्यात येणारा वेतनाचा धनादेश बँकेत/वेतन खात्यात जमा करण्यात येत असेल. त्याच बँकेत त्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक खाते उघडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे बँकेत जमा होणाऱ्या वेतनाच्या रकमेतूनच संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाती नियमाप्रमाणे वेतनाची रक्कम ट्रान्स्फर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे संबंधित महाविद्यालये काटेकोरपणे कार्यवाही करीत आहे याची खात्री करून घ्यावी.

९. संबंधित महाविद्यालयांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करणाऱ्या आदेशाचे पालन करणे आवश्यक आहे.

१०. ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे ते शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उच्च माध्यमिक विद्यालयात/माध्यमिक शाळेत संस्थेत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करीत नाही.

११. संस्थेने महाविद्यालयांसाठी स्वतःच्या मालकीच्या पुरेशा इमारतींची वर्गखोल्या व इतर भौतिक सुविधांच्या सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

१२. विद्यापीठांची रितसर परवानगी घेवून पूर्णवेळ प्राचार्याची निवड समितीव्दारा नेमणूक करणे आवश्यक आहे..

१३. संस्थेविरुध्द कोणत्याही तक्रारी नसाव्यात व न्यायालयीन प्रकरणे नसावीत. शासनाने वेळोवेळी घालून दिलेले नियम व निकष यांचे संस्थेने तंतोतंत पालन करावे.

१४ ज्या महाविद्यालयांना आर्थिक वर्षात रूपये २५ लाख किंवा त्याहून अधिक रकमेचे अनुदान देय होईल, अशा महाविद्यालयांनी सी.ए.जी.(डी.पी.सी.) अधिनियम १९७१ मधील परिच्छेद १४ नुसार महालेखापाल यांच्या लेखापरिक्षा पथकाकडून लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहील.

वरील महाविद्यालयाला वेतनावर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षाखाली दाखवून तो सन २००४-२००५ मधील आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

२२०२-सर्वसाधारण शिक्षण ०३-विद्यापीठीय उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना पंचवार्षिक योजनातर्गत योजना १०४ (एक) (बी) अशासकीय वाङ्मय विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना विस्तारासाठी अनुदाने. (२२०२०९०५) ४१ सहाय्यक अनुदाने मागणी क्रमांक डब्ल्यु-२.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रति -

१ सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
२.महालेखपाल (लेखापरिक्षा)महाराष्ट्र मुंबई
३ महालेखपाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
४ जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग
५ मा.प्रधान .सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
~~... फोंडाघाट ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग.~~
६ प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग